ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ९ जुलै, १९५८ | अंक १८

## विविध माहिती

**अफगाणिस्थानासाठी अंबर चरखे**—अफगाणिस्थानच्या सरकारनें विनंती केल्यावरून भारत सरकार १०० अंबर चरखे तिकडे पाठविणार आहे. हा उपक्रम प्रयोग म्हणून करण्यांत येणार असून चरख्यांचा उपयोग शिकविण्यासाठी भारतामधून कांहीं शिक्षकांनाहि अफगाणिस्थानांत पाठविण्यांत येणार आहे.

**महारोगाविरुद्ध मोहीम**—आसाम राज्य सरकारनें राज्यांतील महारोगाचें निर्मूलन करण्याची मोहीम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. महारोगासंबंधीं प्रचारपत्रकें, महारोग्यांची पहाणी, उपचाराचीं अधिक केंद्रें आणि बऱ्या झालेल्या रोग्यांच्या स्वतंत्र वसाहती इतक्या मार्गांनीं मोहीम करण्यांत येणार आहे.

**वृत्तपत्रांसाठी रशिअन कागद**—भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि रशिआ ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें २,२०० टन वजनाचा वृत्तपत्रांना लागणारा कागद घेऊन एक जपानी बोट कोचीन बंदराला लागली आहे. कराराप्रमाणें आयात करण्यांत आलेला कागदाचा हा पहिला हप्ता आहे.

**जागतिक बँकेचे अध्यक्ष**—जागतिक बँकेचे अमेरिकन अध्यक्ष मि. युजिन ब्लॅक ह्यांची अध्यक्षपदाची मुदत आणखी ५ वर्षांनीं वाढविण्यांत आली आहे. बँक स्थापन होऊन १२ वर्षें झालीं. त्यांपैकी ९ वर्षें मि. ब्लॅक हे बँकेचे अध्यक्ष आहेत. त्यांची वाढलेली मुदत १ मे १९६३ रोजीं संपेल.

**फ्रान्सचा पहिला अणुबाँब**—येत्या ऑक्टोबर महिन्यांत फ्रान्स आपल्या पहिल्या अणुबाँबचा स्फोट करणार आहे. बाँबसाठी लागणारें स्फोटक द्रव्य दक्षिण फ्रान्समध्यें तयार करण्यांत येत आहे. फ्रान्स बड्या राष्ट्रांत मोडत असलें तरी त्याच्याजवळ स्वतःचा अणुबाँब नाहीं. स्फोट कोठें करणार, तें अद्याप समजलेलें नाहीं.

**चीनवरील बहिष्कार व्यर्थ**—अमेरिकेच्या प्रेरणेनें पश्चिम युरोपांतील देशांनीं चीनला लष्करी उपयोगाचा कांहीं महत्त्वाचा माल पाठविण्यावर बंदी घातलेली आहे. पण ह्या बहिष्काराचा फारसा उपयोग होत नाहीं. हाँगकाँग बंदराच्या मार्गानें चीनला जरूर तो माल आयात करतां येतो.

**शाकुंतलाचें कौतुक**—हॉलंडमधील नाट्यमहोत्सवांत कविकुलगुरु कालिदासाच्या शाकुंतल नाटकाचा प्रयोग करण्यांत आला. प्रयोग पहाण्यास हॉलंडच्या राणीसाहेब, भारताचे राजनैतिक प्रतिनिधि इत्यादि मंडळी उपस्थित होती. प्रयोगाचें कौतुक करण्यांत आलें. नाटकाचें भाषांतर एका प्रसिद्ध डच कवीनें केलें होतें, व संगीत मुद्दाम रचण्यांत आलें होतें.

**वस्तुसंग्रहालयांतील नोकर**—वस्तुसंग्रहालयांतील नोकरांना त्यांच्या कामाचें शिक्षण देण्याची एक योजना भारत सरकारनें तयार केली आहे. ह्या शिक्षणासाठी मुंबई व डेहराडून ह्या ठिकाणीं दोन केंद्रें उघडण्यांत येणार आहेत. डेहराडून येथील केंद्रांत १२ विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येणार आहे.

**गहूं खाण्याचा आग्रह**—केरळ राज्य सरकारनें लोकांनीं आपल्या खाण्यांत गव्हाचे पदार्थ अधिक प्रमाणांत आणावे म्हणून प्रचार करण्याचें ठरविलें आहे. प्रचारासाठी येणाऱ्या खर्चापैकी निम्मा खर्च मध्यवर्ती सरकार देणार आहे. तथापि तांदुळाऐवजीं गहूं घेण्याची सक्ति मात्र करण्यांत येणार नाहीं.

**पोटनिवडणुकीचा खर्च**—केरळमधील देवीकुलम् मतदारसंघांत नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीसाठी राज्य सरकारला ६३,००० रुपये खर्च आला. ह्या पोटनिवडणुकींत काँग्रेसच्या उमेदवाराचा कम्युनिस्ट उमेदवारानें पराभव केला. कम्युनिस्ट उमेदवार राज्य सरकारच्या एक मंत्री होत्या.

**वाद्यांचा सहकारी कारखाना**—अखिल भारतीय हस्तव्यवसाय बोर्डातर्फे आंध्र राज्यांत संगीतासाठी लागणारीं वाद्यें सहकारी पद्धतीनें तयार करण्याच्या दृष्टीनें पहाणी करण्यांत आली आहे. वीणा, व्हायोलिन व पेटी ह्यासारखीं वाद्यें तयार करण्याची शक्यता आहे, असें बोर्डाला आढळून आलें.

**सांगली येथील गुदाम**—सांगली येथें शेतीचा माल साठविण्यासाठी बांधण्यांत येणाऱ्या गुदामासाठी ७ एकर जागेची निवड करण्यांत आली आहे. गुदाम बांधण्याच्या कामास पुढील महिन्यात प्रारंभ होईल. त्यासाठी सुमारें १,५०,००० रुपये खर्च येईल.

**तंत्रज्ञांनाहि कामाची खात्री नाहीं**—भारताबाहेर तांत्रिक शिक्षण घेत असलेल्यांची पहाणी मध्यवर्ती सरकारच्या कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेनें केली आहे. तांत्रिक शिक्षण घेत असलेल्या पांच हजार लोकांपैकी ९० टक्के लोकांना भारतांत परत आल्यावर काम मिळेलच असें नाहीं, असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे.

**गुरांच्या वैद्यकाचें दुसरें कॉलेज**—मुंबई राज्यांतील गुरांच्या वैद्यकाचें दुसरें कॉलेज नागपूर येथें उघडण्यांत आलें आहे. नागपूर विद्यापीठाच्या वाचनालयांत कॉलेजचें काम सुरू करण्यांत आलें आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना उद्‌घाटक श्री. यशवंतराव चव्हाण म्हणाले कीं, प्रत्येक २५,००० गुरांसाठी एक पशुवैद्य असावा, अशी सरकारची इच्छा आहे.

### चीनच्या वाढत्या लोकसंख्येचें भय

चीनच्या वाढत्या लोकसंख्येची भीति पाश्चात्य राष्ट्रांतील एतद्विषयक तज्ज्ञ ह्या शतकाच्या सुरवातीपासूनच व्यक्त करीत असत. ह्या वाढत्या लोकसंख्येमुळें पाश्चात्य संस्कृतीला धोका उत्पन्न होईल असें त्यांचें मत होतें. पण, आतां खुद्द चीनमधील तज्ज्ञच अमर्याद लोकसंख्येपासून उत्पन्न होणाऱ्या धोक्याविषयीं बोलूं लागले आहेत. ह्या तज्ज्ञांनीं असा हिशेब केला आहे कीं, आणखी दहा वर्षांच्या कालांत चीनची लोकसंख्या ८० कोटींच्या घरांत जाईल आणि त्यामुळें इतक्या लोकांना कामधंदा पुरविण्याचा प्रश्न बिकट होईल. लोकसंख्येच्या प्रश्नाबद्दल लिहितांना हे तज्ज्ञ म्हणतात की, चीनमधील परिस्थितींत सगळ्यांत मोठा विरोध आहे तो असा की, लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे आणि भांडवलाचा संचय मात्र अतिशय अल्प गतीनें होत आहे. लोकसंख्येची वाढ आणि भांडवलाचा संचय ह्यांच्यांत जी तीव्र विषमता आहे तीमुळें लोकांचा सांस्कृतिक व आर्थिक दर्जा उंचावण्याचें काम अतिशय कष्टाचें झालें आहे. आज चीनमधील लोकसंख्या ६४ कोटींच्या आसपास आहे आणि त्यांत दरसाल १·३ कोटी लोकांची भर पडत आहे. तथापि गेल्या कांहीं वर्षांत चीनमधील धनोत्पादनाचें सामर्थ्यहि मोठ्या प्रमाणावर वाढलें आहे. त्यामुळें अधिक लोकांना कामधंदा देणें शक्य झालें आहे. १९४९ ते १९५७ ह्या कालावधींत १ कोटी लोकांना नव्यानें रोजगार पुरविण्यांत आला, आणि विकासाची गति अशीच चालू राहिल्यास दरसाल १० लाख औद्योगिक कामगारांची गरज चीनला लागेल.

### राहण्यास घर मिळविण्यासाठी धडपड

मुंबईंत राहत्या घरांची टंचाई किती तीव्र आहे ह्याचें एक गमक परवा आढळून आलें. मुंबई हौसिंग बोर्डानें कमी उत्पन्नाच्या लोकांना राहण्याची जागा पुरविण्याची एक योजना आंखली आहे. बोर्डातर्फे अंधेरी, घाटकूपर, लोअर परळ, गोरेगांव आणि चेंबूर ह्या उपनगरांतून सुमारें ७०० जागा बांधण्यांत येत आहेत. ह्या जागा पावसाळा संपण्याच्या सुमारास तयार होतील. बोर्डानें जागांसाठी अर्ज मागविले होते. दोन खोल्यांच्या ३४९ जागा आणि तीन खोल्यांच्या १७८ जागा ह्यांचें वांटप करण्यासाठी अर्ज मागविले असतां गेल्या आठवड्याच्या सुरुवातीला २५० अर्ज आले, आणि बोर्डानें ४ लाख रुपये गोळा केले. बोर्डाकडे अजूनहि अर्ज यावयाचे आहेत. ज्या लोकांचें एकूण मासिक उत्पन्न ५०० रुपयांपेक्षा अधिक नाहीं अशाच लोकांना जागा देण्यांत येणार आहेत. ह्या योजनेचें वर्णन भाडें–अनामत–योजना असें करण्यांत येत आहे. जें घर बांधण्यास १०,००० रुपयांपेक्षा अधिक खर्च आला असेल तें मिळविण्यासाठी अर्जदाराला घराचा खर्च उणे ८,००० रुपये इतकी रक्कम अनामत द्यावी लागेल. जें घर बांधण्यास १०,००० रुपयांपेक्षा कमी खर्च आला असेल तें मिळविण्यासाठी खर्चाच्या २० टक्के रक्कम अनामत म्हणून ठेवावी लागेल. ह्या अनामत रकमेंतून पांच वर्षेंपर्यंत भाडें कापून घेण्यांत येईल व अनामत रकमेची फेड करण्यांत येईल. पांच वर्षांनंतर मात्र भाडेकरूंना दरमहा वाजवी भाडें द्यावें लागेल. ह्या योजनेप्रमाणें घरें मिळविण्याची धडपड अनेक लोक करीत आहेत.

### पोलाद–कारखान्यांची वाटचाल

रुरकेला, भिलई आणि दुर्गापूर येथें उभारण्यांत येत असलेले पोलादाचे कारखाने चालू झाले म्हणजे भारताची परदेशी हुंडणावळीची अडचण बरीच कमी होणार आहे. हे सर्व कारखाने प्रत्यक्ष उत्पादन करूं लागल्यावर तेथील काम हळूहळू भारतीय एंजिनिअर्सनाच करावें लागणार आहे. ह्या सर्व कारखान्यांना मिळून सुमारें ७०० तंत्रज्ञ लागणार आहेत. भारतीय एंजिनिअर्स काम शिकून तयार झाले म्हणजे ते परदेशीय एंजिनिअर्सच्या जागा घेतील. त्या दृष्टीनें ब्रिटन, पश्चिम जर्मनी आणि रशिआ ह्या देशांतून अनेक हिंदी एंजिनिअर्सना शिक्षणासाठी पाठविण्यांत आलें आहे. रुरकेला येथील कारखान्याच्या प्रत्यक्ष उत्पादनास येत्या ऑक्टोबरमध्यें सुरुवात होणार होती; परंतु गोदी कामगारांच्या नुकत्याच झालेल्या संपामुळें आतां विलंब लागणार आहे. भिलई येथील पोलाद कारखान्याच्या उभारणीचें काम मात्र ठरल्याप्रमाणें चालू आहे. कारण, कारखान्यासाठी आयात होणारी यंत्रसामुग्री विझगापट्टम् बंदरांतून येते. विझगापट्टम् बंदरांत संपाचा फारसा जोर नव्हता. चालू वर्ष संपण्यापूर्वी भिलई येथील उत्पादनास प्रारंभ होण्याची शक्यता आहे. दुर्गापूर येथील कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होण्यास १९५९ सालची अखेर येईल असा अंदाज आहे. कारखाने निरनिराळ्या वेळीं सुरू होत असल्यानें वाकबगार तंत्रज्ञांची उणीव एकदम भासणार नाहीं. तिन्ही कारखान्यांतील उत्पादन वेगवेगळ्या प्रकारचें आहे. दुर्गापूर व भिलई येथें रेल्वेचें सामान तयार होणार आहे.

### दीर्घायुष्यासाठी संमोहन विद्येचा उपयोग

ब्रिटनमधील सोसायटी ऑफ मेडिकल हिप्नॉटिस्ट ह्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. व्हॅन फेल्ट ह्यांनीं असा एक विचार मांडला आहे की, दीर्घायुषी होण्यासाठी संमोहन विद्येचा उपयोग करण्यांत यावा. ते म्हणतात कीं माणसाला दीडशें–दोनशेंच काय पण अडीचशें वर्षें जगता येणेंहि शक्य आहे. शंभर वर्षांची आयुर्मर्यादा लाभलेले लोक पाहिले तर असें दिसून येतें कीं, त्यांना जीवनांत आनंद वाटत होता, आस्था वाटत होती आणि आणखी जगावें असें वाटत होतें. त्यांची ही मनःस्थिति संमोहन विद्येनें निर्माण करतां येणें शक्य आहे. कारण, संमोहनाच्या उपयोगानें चिंता, अस्वस्थता आणि मनाचा ताण हीं कमी करता येतात. शतायुषी झालेले लोक त्यांना नकळत स्वतःवरच संमोहनाच्या अस्त्राचा उपयोग करतात. जीवनाचा आस्वाद घेण्याची त्यांची जबर इच्छा त्यांच्या इंद्रियांवर व ग्रंथींवर चांगले परिणाम घडवून आणते. त्यामुळें त्यांची कार्यक्षमताहि टिकून राहते. स्त्रिया पुरुषांपेक्षां अधिक जगल्याचें दिसून येतें. त्याचें कारण असें आहे कीं, स्त्रिया आपल्या भावना कोंडून धरीत नाहींत. अर्थातच त्यांना मानसिक ताणाचा ताप होत नाहीं. पुरुष मात्र आपल्या भावनांची कोंडी करतात. त्यामुळें त्यांना मानसिक ताणापासून उद्भवणाऱ्या रोगांना तोंड द्यावें लागतें. पुरुषांनीं आपल्या भावनांना वाट करून देण्यासाठी संमोहनविद्येचा उपयोग केला तर ते स्त्रियांपेक्षां अधिक काळ जगूं लागतील. ह्या विद्येमुळें पुरुष २५० वर्षांपर्यंत व स्त्रिया २०० वर्षांपर्यंत जगूं शकतील.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. ९ जुलै, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतांतील परदेशी हुंडणावळीची परिस्थिति

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अयंगार, ह्यांनीं ३० जून, १९५८ रोजीं मुंबई येथें 'भारतांतील परदेशी हुंडणावळीची परिस्थिति' ह्यावर भाषण केलें. ह्या विषयासंबंधीं लोकांत सध्या चिंता निर्माण झालेली असल्यानें, त्यांच्या विवेचनास विशेष महत्त्व आहे. परिस्थितीचा कठीणपणा ध्यानांत येण्यास व टणकपणा निर्माण होण्यास त्याची मदत होईल. केवळ अपरिहार्यतेनेंच समर्थन करून चालणार नाहीं; मार्ग काढून तो निश्चयानें आक्रमण्याचें सामर्थ्य सरकारांत व जनतेंत निर्माण व्हायला हवें.

### कठीण परिस्थितीशीं समरस झालें पाहिजे

"एप्रिल, १९५८ पासून आपल्या स्टर्लिंगमधील शिलका दर आठवड्याला ५ कोटी रुपये ह्या गतीनें घटत आहेत; वर्षाच्या प्रारंभीं तो वेग आठवड्यास २ कोटी रुपये एवढाच होता. त्या वेळीं, आपल्या हुंडणावळीच्या सुधारलेल्या परिस्थितीबद्दल आनंद व्यक्त केला गेला व हुंडणावळीचा प्रश्न सुटल्यासारखा कित्येक उद्योगपतींना वाटूं लागला. ह्या अनुकूल परिस्थितींत एकदम बिघाड झाल्याचा भास व्हावा, असा सध्या होत असलेल्या चर्चेचा सूर आहे. आपल्या परदेशी हुंडणावळीच्या परिस्थितीचें पूर्णपणें आकलन न झाल्यामुळें, त्याविषयीं आशेपासून निराशेकडे उद्गारांचा लंबक हेलकावे खात रहातो, असें दिसून येतें. वस्तुस्थिति अशी आहे, कीं दुसरी पंचवार्षिक योजना सुरू करतांनाच सध्या अनुभवांत येणाऱ्या अडचणींची कल्पना होती. तेव्हां सध्याच्या परिस्थितीचें 'भयंकर अडचण' असें वर्णन केलें, तरी ती अडचण कांहीं काळ रहाणारच आहे; मग तींत चढउतार कितीहि होवो! आपल्या देशानें ही गोष्ट लक्षांत ठेवून त्याप्रमाणें रोजचें जीवन जगण्यास, त्या परिस्थितीशीं समरस होण्यास व भवितव्याबद्दल आशा बाळगून धैर्यानें राहण्यास मानसिक तयारी केली पाहिजे व त्याप्रमाणें प्रत्यक्ष राहिलें पाहिजे.

### त्यांत गूढ कांहीं नाहीं!

"देशाच्या परदेशांतील शिलकांची पातळी आणि देशाची अंतर्गत आर्थिक परिस्थिति, ह्यांच्या परस्पर–संबंधांत गूढ असें कांहीं नाहीं, ह्या विषयाची सार्वजनिक चर्चा व्हावी व तो सर्वांना नीट समजावा, हें आवश्यक आहे. कारण, गैरमाहितीमुळें चुकीचे निष्कर्ष काढले जातात. इतकेंच नव्हे तर सरकारच्या योग्य नियमनाची कारणमीमांसा लक्षांत येणें अवघड होऊन बसलें. सर्वांना ह्या बाबतींत विश्वासांत घेणें जरुरीचें आहे.

### कांहीं गैरसमजांचें निराकारण

"परदेशांतील शिलकांचा देशाच्या चलनाच्या बळकटीशीं संबंध जोडण्याची प्रवृत्ति दिसून येते. चलनाला सोन्याचा आधार आवश्यक होता, त्या काळीं ह्यासंबंधाचें समर्थन करतां आलें असतें. राष्ट्रीय चलनाचें रूपांतर सोन्यामध्यें देशांत व परदेशांतहि करावें लागे, तेव्हां चलनाला पुरेशा सोन्याचा किंवा सोन्यांत तात्काळ रूपांतर करतां येईल अशा परदेशी रोख्यांचा पुरेसा आधार आवश्यकच होता. ह्या पद्धतींत मध्यवर्ती बँकेचें कार्य सरळ होतें. त्यांत नाणेंविषयक व्यवस्थेचा फारसा प्रश्नच नव्हता. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत सुवर्ण चलन उरलें नाहीं आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत बहुतेक देशांतील पैशाचा पुरवठा वाढला पण त्यांचा परदेशीय रिझर्व्हचा पाया कमी झाला. ह्या अनुभवामुळें दृष्टिकोणच पालटला. चलनाला सोन्याचा व परदेशी हुंडणावळीचा आधार किती मोठा आहे ह्या गोष्टीचें महत्त्व कमी झालें आणि चलनाचा मजबूतपणा, देशाची मूलभूत आर्थिक सुदृढता आणि त्याच्या आर्थिक व पैसाविषयक बाबींचा कारभार हाकण्याची हातोटी, ह्यांस महत्त्व प्राप्त झालें. चलनी नोटांचा परदेशी रिझर्व्हसशीं संबंध कमी करण्याकडे मध्यवर्ती बँकिंग कायद्यांचा सर्वसाधारण कल आहे; आपणहि कांहीं वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करून तसेंच घडवून आणलें आहे. तेव्हां परदेशी हुंडणावळीच्या प्रश्नाची चर्चा करतांना हें सर्व लक्षांत ठेवून, चलनाच्या भक्कमपणाविषयीं सचिंत होण्याचें कारण नाहीं.

### अनुकूल लक्षणें

"आपल्या देशाच्या आर्थिक संसाराचा पाया दिवसेंदिवस बळकट होत चालला आहे. ह्यापेक्षा खूपच अधिक करायला हवें असलें, तरी अन्नाचें उत्पादन व व्यापारी पिकांचें उत्पादन ह्यांत पहिल्या पंचवार्षिक योजनेस प्रारंभ झाल्यानंतर बरीच वाढ झालेली दिसून येत आहे. यंत्रसामुग्री व धातु ह्यांच्या आयातीचा प्रवाह चालू आहे; उत्पादनांत विविधता येत असून औद्योगिक राष्ट्र ह्या दृष्टीनें आपल्या देशास थोड्याच अवधींत कांहीं महत्त्वाचें स्थान प्राप्त होण्याचीं लक्षणें दिसत आहेत. लोकसंख्येच्या वाढीचें भयंकर दडपण असूनहि, राष्ट्रीय उत्पन्न व दरमाणशीं उत्पन्न हीं दोन्हीं वाढीच्या मार्गावर आहेत. करविषयक आणि नाणेंविषयक कारभारांत पुष्कळच कडकपणा दर्शविला आहे; व्यापारी वर्गाला तर असें वाटूं लागलें आहे कीं, करविषयक धोरण जरूरीपेक्षा कडक झालें आहे. देशाच्या मूलभूत आर्थिक मजबुतीच्या मापानें रुपया पूर्वीप्रमाणेंच मजबूत आहे; बहुसंख्य लोकांना त्याची जाणीव आहे. दुर्दैवानें, आपल्यांतील कांहीं लोकांना, आपली आर्थिक इमारत मूलभूत गोष्टींत अधिकाधिक मजबूत होत आहे ह्याचें आकलन होत नाहीं; त्यामुळें ते गैरवाजवी नैराश्य प्रकट करतात. अमेरिकन सरकारांतील एक महत्त्वाचे गृहस्थ मि. डग्लस डिलन ह्यांनीं हिंदी रुपया १० ते १५ वर्षांत दुर्मिळ चलन बनूं शकेल असें म्हटल्याचें प्रसिद्ध झालें असतांना, अशा तऱ्हेचा नैराश्यवाद आश्चर्यकारक वाटतो!

### अन्नाची आयात हें अस्थिरतेचें मुख्य कारण

"परदेशांतील देण्याघेण्यांतील तफावत भागविण्यासाठी परदेशांत शिलका राखण्याची भाषा बोलली जाते, तेव्हां त्यांत मामुली, नेहमीच्या व्यापाराची कल्पना असते. निर्गतीच्या

मालाचा आकार व किंमत ह्यांतील चढउतारामुळें दक्षिण अमेरिका खंड व आशिया खंड ह्यांतील कित्येक अविकसित देशांना व ऑस्ट्रेलियालाहि परदेशी देण्याघेण्याच्या परिस्थितीनें हेलकावे खाण्याचा अनुभव आहे. कच्च्या मालाच्या निर्गतीवर ज्यांचें अवलंबन जास्त आहे, अशा देशांना, ज्यांचें तें अवलंबन कमी आहे अशा देशांपेक्षा जास्त प्रमाणांत परदेशी शिलका बाळगाव्या लागतात. भारताच्या निर्गत मालाचे बाबतींत फार मोठे हेलकावे संभवनीय नसतात; तथापि व्यापारांतील मालांत विविधता आणण्याची आवश्यकता आतां भासूं लागली आहे. कांहीं झालें तरी अन्नाची आयात ही बाब हेलकावे देणारी आहे. आपल्या आर्थिक परिस्थितींत अन्नाचें उत्पादन अजूनहि अनिश्चितता निर्माण करतें. अन्नोत्पादन ५% जरी कमी झालें तरी ३० लक्ष टनांची तूट येते व त्या प्रमाणांत आयात वाढून तिचें देणें भागवावें लागतें. ह्या आयातीची द्यावी लागणारी किंमत १९५१–५२ मध्यें २२८ कोटी रुपये भरली. १९५५–५६ मध्यें ती फक्त २९ कोटी रु. झाली. म्हणजे ती २०० कोटी रुपयांनीं कमी होती. १९५७–५८ मध्यें ती पुन्हां १५२ कोटी रुपयांवर गेली. ह्याचा अर्थ, आपल्या परराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारांत अन्नाची आयात ही फार मोठी अस्थिर बाब आहे.

"पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अन्नपरिस्थिति सुधारल्यामुळें परदेशी देण्याचा प्रश्न उग्र झाला नाहीं; आतां ती परिस्थिति बिघडल्यामुळें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत परदेशी देण्याचे बाबतींत अडचणी भासूं लागल्या आहेत.

### नेहमीच्या देण्यांची तरतूद

"अन्नांची आयात किंवा निर्गत मालाचा आकार व किंमत ह्यांच्या चढउताराची तरतूद करण्यापुरताच प्रश्न असता, तर तो फार बिकट झाला नसता. कांहीं वर्षें धान्य आयातीमुळें अथवा निर्गतींत घट झाल्यामुळें परदेशांतील शिलका खालीं गेल्या असत्या; इतर वर्षांत त्यांत भर टाकतां आली असती. सध्याची, उतरलेल्या शिलकांची रक्कम (सुमारें ३०० कोटी रु.) गेल्या तीन वर्षांतील सरासरी चार महिन्यांच्या आयातीस पुरेशी आहे; इतर कित्येक देशांच्या तत्सम शिलकेशीं तिची तुलना केली तर आपली शिल्लक अपुरी वाटणार नाहीं आणि सामान्य परिस्थितीला तोंड देण्यास ती पुरेशी होईल.

### औद्योगिक योजनांसाठी प्रचंड आयात

"भारतांतील खरा प्रश्न असा आहे, कीं अन्नपुरवठ्याच्या हेलकाव्यांचा परदेशी शिलकांना ताण सोसावा लागतो, इतकेंच नव्हे तर देशाच्या औद्योगिक उद्धाराच्या योजनांसाठी कराव्या लागणाऱ्या आयातीचा (पोलाद-निर्मिति, हेवी मशिनरी, मशीन टूल्स, रसायनें, इत्यादि) भार त्या शिलकांवर पडतो. १९५५–५६ मध्यें आपल्याला आयातीसाठी ७५१ कोटी रुपयांची तरतूद करावी लागली; १९५६–५७ मध्यें त्याची रक्कम १०७७ कोटी रुपये झाली आणि १९५७–५८ मध्यें ती रक्कम ११७४ कोटी रुपयांवर गेली. कांहीं जिनसांचें अंतर्गत उत्पादन वाढून त्यांची आयात उतरली, तरी सुद्धा आयातींत एवढी प्रचंड वाढ झालीच. साहजिकच, आपल्या परदेशांतील शिलका खूपच खाली उतरल्या. १९५६–५७ मध्यें दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली, तेव्हां ७४८ रु. च्या परदेशी शिलका होत्या; एप्रिल १९५८ च्या आरंभीं त्यांची रक्कम २६७ कोटी रु. उरली. इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडून २० कोटी डॉलर मिळाले, बऱ्याच देण्यांना मुदतवाढ मिळाली, आणि अन्नाच्या आयातीस अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० चा फायदा मिळाला, म्हणून बरें; नाहींतर परदेशी शिलका तळासच पोंचल्या असत्या.

### सर्वच औद्योगिक देशांनीं प्रथम परदेशी भांडवल मिळविलें

"आपण हातीं घेतलेला औद्योगीकरणाचा कार्यक्रम आपणच पार पाडावयाचा म्हटलें, तर परदेशी शिलकांचा साठा प्रचंडच असायला हवा. ज्या शिलका आपण साठवूं शकलों, त्यांनाहि अतिशय कष्ट व त्रास पडलेले आहेत. गेल्या महायुद्धाचे काळांतील सक्तीची उपासमार आणि बंगालमधील लक्षावधि लोकांचे दुष्काळांतील बळी ह्यांमुळेंच त्या शिलका शक्य झाल्या. भारतांतील लोकांचें दरमाणशीं अत्यल्प उत्पन्न, बचतीला अतिशय थोडा वाव आणि वाढत्या लोकसंख्येचा ताण, ह्या भारतीय आर्थिक संसारांतील मूलभूत बाबी आहेत. ह्या परिस्थितींत, मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण पुरेशा परदेशी मदतीखेरीज अशक्य आहे; कांहीं वर्षें तरी ती मदत मिळत राहिली पाहिजे. सध्याच्या औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांचा इतिहास हेंच सांगतो. ग्रेट ब्रिटनच्या औद्योगिक क्रांतीस त्या देशांत परदेशांतून आलेले लोक व त्यांनीं बरोबर आणलेलें भांडवल व हस्तकौशल्य, हीं मोठ्या अंशीं कारणीभूत आहेत. औद्योगिक क्रांतीनंतर ग्रेट ब्रिटननें मोठ्या प्रमाणावर भांडवलाची निर्गत केली. १८२५ नंतरच्या ५० वर्षांत त्यापैकीं निम्में युरोपखंडांत निर्गत झालें. पुढें फ्रान्स व जर्मनी हे देशहि भांडवलाची निर्गत करणारे बनले; तेथून बरेंच भांडवल अमेरिकेकडे गेलें. जपानच्या औद्योगिक प्रगतीसहि परदेशी भांडवलाचें मोठें साहाय्य झालेलें आहे. रशियानें मात्र परदेशांची मदत न घेतां औद्योगिक प्रगति केली. त्याच्या बाबतींत दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. १८८१ ते १९१३ च्या दरम्यान त्या देशाकडे फ्रान्समधून बरेंच भांडवल निर्गत झालें होतें; आणि दुसरी गोष्ट म्हणजे क्रांतीनंतर रशिआनें सक्तीच्या उपायांनीं लोकांच्या उपभोगावर आळा घातला; ही पद्धत आपल्या देशांत पूर्णपणें अमान्य केली जाईल.

### अल्प मुदतीचीं देणीं गैरसोईचीं

"ह्या सर्व गोष्टी विस्तारानें सांगण्याचें कारण असें कीं, 'आपण आपल्या कुवतीप्रमाणेंच कार्यक्रम आखला पाहिजे; आपल्या योजनांसाठीं परदेशांची मदत मागण्यांत प्रतिष्ठा राहत नाहीं,' अशी विचारसरणी दिसून येत आहे. परदेशी मदत मुख्यतः कर्जाच्या स्वरूपांतच उपलब्ध होणार, हें उघड आहे. इतर देशांच्या मानानें आपलें परराष्ट्रीय देणें बेताचें आहे; तें आपलें राष्ट्रीय उत्पन्न व परदेशांतून होणारी कमाई ह्यांच्या मानानें ज्यास्त नाहीं. म्हणून, परदेशी देण्यांत भर पडली, तर ती सह्यच होईल. परंतु, हीं देणीं दीर्घ मुदतीचीं असावयास हवींत. अल्पमुदतीचीं देणीं बरींच आहेत, त्यामुळें आपल्या अडचणींचे स्वरूप बिकट झालेलें दिसतें. आपणाला आणखी ५०० कोटी रुपयांची गरज आहे; उलट १९६१–६२ आणि १९६३–६४ ह्या मुदतींत आपणांस मोठीं देणीं भागवावयाचीं आहेत; त्याला मार्ग शोधायला हवा. वाहतुक, पाणीपुरवठा व वीजपुरवठा ह्यांतून पैशांच्या स्वरूपांतील मिळकत फार मंद गतीनें होते व ती मिळकतहि थोडी असते; म्हणून परराष्ट्रीय कर्जें दीर्घ मुदतीचीं व अल्प व्याजाचीं असणें जरूर आहे.

### चतुःसूत्री उपाययोजना

"अशा परिस्थितींत आपल्या देशानें काय केलें पाहिजे? तात्त्विक दृष्ट्या, फक्त चार गोष्टी शक्य आहेत. (अ) आपला कार्यक्रम मर्यादित करावयाचा, (ब) आयात कमी करावयाची, (क) निर्गत वाढवावयाची आणि (ड) परदेशांकडून आणखी मदत मिळवावयाची. अन्नाच्या उत्पादनाला अग्रस्थान देऊन, आयातीमधील अन्नाची मोठी बाब कमी करून टाकली पाहिजे, हें गृहीतच धरलें आहे."

## १० राज्य सरकारांची ४७१/२ कोटी रुपयांची कर्ज उभारणी

### १५ जुलै रोजीं कर्जाचा भरणा सुरू

भारतांतील १० राज्य सरकारांनीं ४३/४ टक्के व्याजाच्या दराचीं एकूण ४७॥ कोटी रुपयांचीं कर्जें उभारण्याचें जाहीर केलें आहे.

| राज्य | कर्जाची रक्कम | मुदत भरण्याचें वर्ष | विक्रीची किंमत |
|---|---|---|---|
| १. आंध्र प्रदेश | ५ कोटी रु. | १९७० | ९९.५० रु. |
| २. मुंबई | १० कोटी रु. | १९७० | १००.०० रु. |
| | | १९७१ | ९९.७५ रु. |
| ३. केरळ | ३ कोटी रु. | १९७० | ९९.०० रु. |
| ४. मध्यप्रदेश | २ कोटी रु. | १९७० | ९९.०० रु. |
| ५. मद्रास | ५ कोटी रु. | १९७० | ९९.५० रु. |
| ६. म्हैसूर | ५ कोटी रु. | १९७० | ९९.५० रु. |
| ७. ओरिसा | ३ कोटी रु. | १९७० | ९९.०० रु. |
| ८. राजस्थान | २॥ कोटी रु. | १९७० | ९९.५० रु. |
| ९. उत्तर प्रदेश | ७ कोटी रु. | १९७० | ९९.५० रु. |
| १०. पश्चिम बंगाल | ५ कोटी रु. | १९७० | ९९.५० रु. |

या सर्व कर्जांची परतफेड १५ जुलै, १९७० रोजीं करण्यांत येईल. मात्र मुंबई सरकारच्या ४३/४ टक्के दराच्या १९७१ च्या कर्जाची परतफेड १५ जुलै, १९७१ ला होईल.

या सर्व कर्जांचा भरणा १५ जुलै, १९५८ रोजीं सुरू होईल आणि हें काम १९ जुलै, १९५८ रोजीं अथवा प्रत्येक कर्जाची रक्कम जवळजवळ ठरविल्याइतकी भरल्यास कोणत्याहि प्रकारची पूर्वसूचना न देतां त्याआधीं देखील बंद करण्यांत येतील. जाहीर करण्यांत आलेल्या कर्जाच्या रकमेच्या १० टक्के इतकी अधिक रक्कम कर्ज म्हणून स्वीकारण्याचा अधिकार सर्व राज्य सरकारांनीं स्वतःकडे राखून ठेवला आहे.

सदर कर्जावर १५ जुलै, १९५८ पासून व्याज मिळेल व या व्याजावर प्राप्तीकर आकारण्यांत येईल.

### साखरेची निर्गत: कारखान्यांवर सक्ति

साखरेच्या निर्गतीस चालना देण्यासाठी भारत सरकारनें एक ऑर्डिनन्स काढला आहे. त्या अन्वयें ५०,००० टन साखरेच्या निर्गतीची व्यवस्था होणार आहे. प्रत्येक कारखान्याच्या उत्पादनाच्या प्रमाणांत त्याचेकडून साखर मिळविली जाईल व इंडियन शुगर मिल्स असोसिएशन त्या साखरेची सरकारच्या वतीनें निर्गत करील. जो कारखाना साखर देणार नाहीं, त्याला न दिलेल्या साखरेवर दर मणास १७ रु. जादा जकात द्यावी लागेल. निर्गत झालेल्या साखरेस जी किंमत येईल, ती साखर कारखान्यांना वांटून दिली जाईल. आज कारखान्यांजवळ जेवढी साखर शिल्लक आहे, त्यावर प्रत्येक मणास आठ आणे एवढा तोटा त्यांना त्यामुळें सोसावा लागेल. साखरेची किंमत मणाला एक रुपया एवढी वाढलेली असल्यानें, कारखान्यांनीं तक्रार करूं नये, अशी सरकारची अपेक्षा आहे.

**चीनची पहिली अणुभट्टी**—चीनमधील पहिली अणुभट्टी गेल्या महिन्याच्या मध्याच्या सुमारास चालू करण्यांत आली. भट्टी उभारण्याच्या कामीं रशिअन अणुशास्त्रज्ञांनीं सर्व प्रकारची मदत केली. त्याशिवाय अणुविच्छेदन करणारें मोठें यंत्रहि चीनमध्यें उभारण्यांत आलें आहे.

## सहकारी क्षेत्रांतील नोकरवर्गाचें शिक्षण

### मध्यवर्ती समितीकडून वेळापत्रकानुसार प्रगति

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील वाढत्या सहकारी कार्यक्रमाच्या गरजा पुऱ्या करण्यासाठी अनेक नोकर लागणार असल्यानें त्यांना शिक्षण देण्यासाठी एक मोहीम आंखलेली असून तें काम वेळापत्रकानुसार प्रगत होत आहे.

सहकारी संस्थांतून व्यवस्थापक, हिशेबनीस, देखरेखनीस व हिशेबतपासनीस म्हणून काम करण्यासाठी यापूर्वीच सुमारें १४,००० उमेदवारांना शिक्षण दिलेलें आहे. दुसऱ्या योजनेच्या राहिलेल्या तीन वर्षांत १४ राज्यांतील आणि केंद्रशासित प्रदेशांतील ४७ शाळांत आणखी १५,००० जणांना शिकवून तयार करण्यांत येईल.

समाज विकास गटांत सहकारी संस्थांच्या स्थापनेस उत्तेजन देण्यासाठी १२२० गट सहकारी अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यांत आलें असून प्रतिवर्षी आणखी ७०० ते ८०० अधिकाऱ्यांना शिक्षण दिलें जाईल.

भारत सरकारनें १९५३ मध्यें स्थापन केलेल्या मध्यवर्ती समितीकडून सहकारी क्षेत्रांतील सर्व प्रकारच्या नोकरवर्गास शिक्षण देण्याची सोय केली जाते.

खरेदी विक्री संघटना, लँण्ड मॉर्गेज बँका व गुदामें यासारख्या खास यंत्रणांस लागणाऱ्या तांत्रिक नोकरवर्गाच्या शिक्षणाबाबतहि प्रगति झालेली आहे. पुणें, मद्रास, मीरत, रांची व इंदूर या ठिकाणीं असलेल्या प्रादेशिक शिक्षण केंद्रांत सहकारी खरेदीविक्री व्यवहाराच्या अभ्यासक्रमाची सोय असून तेथें आतांपर्यंत ३४७ जणांनी शिक्षण घेतलें असून सध्यां १०९ जण शिकत आहेत.

पुणें येथील अ. भा. सहकारी शिक्षण महाविद्यालयांत, निरनिराळ्या राज्यांतील सहकारी खातीं व संस्था यांस लागणाऱ्या ४०० वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी ३१० जणांचें शिक्षण पुरें झालें असून ३७ जण सध्यां शिकत आहेत.

## Higher Diploma in Co-operation

### EXAMINATION RESULT

The Result of the Examination for the Higher Diploma in Co-operation, held in April, 1958.

57 students appeared for the Examination and 53 passed. Percentage of passing is 93.

The numbers of those who have passed are arranged in order of merit and given below:

**First Class**

14, 55, 43, 22, 7, 26, 40, 13, 11, 19, 49, 38, 16, 35 and 20.

**Second Class**

31, 41, 6, 34, 2, 12, 54, 30, 5, 48, 8, 33, 45, 27, 32, 25, 36, 47, 17, 52, 57, 46, 3, 28, 24, 15, 39 and 50.

**Pass Class**

18, 4, 53, 21, 29, 37, 42, 23, 9 and 56.

Prizes of Rs. 100/- and Rs. 50/- are awarded to No. 14 and 26 respectively.

P. M. CHENGAPPA
Principal,
*Co-operative Training College*
POONA 1.

## बँकिंग कंपनीज ॲक्टाची १९५७ मधील अंमलबजावणी

### ७ वें कलम ( 'बँक,' 'बँकर,' 'बँकिंग' ह्या शब्दांचा वापर )

१९५६ अखेर ३३ बँकांनीं ह्या कलमाचा भंग केला होता. त्यांपैकीं एक व्हॉलंटरी लिंकिडेशनमध्यें गेली. बाकीच्या बँका दुरुस्ती करण्याच्या मार्गांत आहेत.

### ९ वें कलम ( बिगर–बँकिंग जिंदगीची विल्हेवाट )

१९५६ अखेर ४५ बँकांनीं ह्या कलमाचा भंग केला होता; त्यांत १९५७ मध्यें ५ बँकांची भर पडली. ह्या ४५ बँकांपैकीं दोघांना लायसेन्स नाकारण्यांत आला. ५ बँकांनीं आपले व्यवहार कलमाच्या कक्षेंत आणले. ३८ बँकांना त्यासाठीं मुदत वाढवून देण्यांत आली.

### १० वें कलम ( मॅनेजिंग एजंटसच्या नेमणुकीस बंदी व कांहीं प्रकारच्या नेमणुकांवर बंधनें )

ह्या कलमाचा भंग करणाऱ्या २५ बँकांत १९५७ मध्यें ४ बँकांची भर पडली. ६ बँकांनीं ह्या कलमाच्या अंमलबजावणीची माफी मागितली. ४ बँकांनीं परिस्थिति कायद्यांत आणून ठेवली व ७ बँकांना अंमलबजावणीच्या माफीची शिफारस करण्यांत आली. २५ बँकांचा कायद्यांत बसण्याचा प्रयत्न चालू आहे.

### ११ वें कलम ( किमान वसूल भांडवल व रिझर्व्हज् )

अहवालाचे वर्षी, ११ व्या कलमाची अंमलबजावणी करतां यावी म्हणून ५ बँकांनीं केलेले अर्ज कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें रिझर्व्ह बँकेकडे शिफारसीसाठीं पाठवले. त्यांपैकीं चार अर्जांची बँकेनें शिफारस केली. अशा अर्जांची एकूण संख्या १९५७ अखेर २०६ झाली आहे.

### १५ वें कलम ( डिव्हिडंडवर नियंत्रण )

ह्या कलमाला न जुमानतां, १९५७ सालीं ११ बँकांनीं भांडवली खर्च लिहून न टाकतां डिव्हिडंड जाहीर केलें, ही गोष्ट त्यांच्या नजरेस आणून कलमांतील अटी पाळण्यास त्यांना सांगण्यांत आलें.

### १७ वें कलम ( रिझर्व्ह फंड )

नफ्याच्या २०% भाग रिझर्व्ह फंडांत घातला पाहिजे, ही अट १६ बँकांनीं पाळली नाहीं. चालू वर्षांतील वाढावा किंवा पुढील वर्षांतील नफा ह्यांतून ती तूट भरून काढण्याचें त्या बँकांनीं मान्य केलें.

### १९ वें कलम ( सबसिडिअरी कंपन्यांच्या स्वरूपावर नियंत्रण )

१९५६ अखेर ह्या कलमाचा भंग करणाऱ्या २ बँका होत्या. त्यांपैकीं एकीला लायसेन्स नाकारण्यांत आला व दुसरीनें दुरुस्ती घडवून आणली. १९५७ मध्यें आणखी ४ बँकांनीं ह्या कलमाचा भंग केला, त्यांपैकीं २ बँकांनीं दुरुस्ती केली आहे.

### २२ वें कलम ( बँकांना लायसेन्स )

१९५७ मध्यें ३ हिंदी शेडयूल्ड बँकांना लायसेन्स देण्यांत आला. म्हणजे, १९५७ अखेर ५२ लायसेन्स देऊन झाले. ह्या ५२ बँका, अधिक स्टेट बँक ऑफ इंडिया, अधिक ३ मोठ्या स्टेट–असोसिएटेड बँक्स ह्यांत मिळून १३०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. म्हणजे, भारतांतील सर्व बँकांकडील ठेवींपैकीं ९०% ठेवी त्यांच्याकडे आहेत. ३९ बिगर–शेडयूल्ड बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला; अशा बँकांची संख्या १०७ झाली आहे. ३५३ बँकांचे लायसेन्ससाठीं अर्ज अजून पडून आहेत. लायसेन्ससाठीं पात्र होण्यास प्रत्येक बँकेस योग्य तितका वेळ दिला जात आहे, पण बँका त्यांच्या व्यवहारांतील चुका सुधारण्याचे कामीं उपाय योजण्यांत थोडा अंगचुकारपणा करीत आहेत; त्यामुळें लायसेन्स देण्याचे बाबतींत प्रगति मंद आहे.

### २९ वें कलम ( हिशेब व ताळेबंद )

१९५७ मध्यें १२ बँकांनीं ह्या कलमाचा भंग केला; ठराविक नमुन्याप्रमाणें हिशेब तयार केले नाहींत. चूक त्यांच्या नजरेस आणून ती सुधारण्यास त्यांना सांगण्यांत आलें.

### ३१ वें कलम ( रिटर्नस् पाठविणें )

कित्येक बँकांना ताळेबंद व नफातोटापत्रक पाठविण्यास आणखी तीन महिन्यांची मुदत देण्यांत आली, तर कांहीं लहान बँकांना प्रसिद्धीचा खर्च झेपणार नाहीं असें आढळून आल्यावरून ह्या कलमाची त्यांना माफी देण्यांत आली.

## दि सारस्वत को–ऑपरेटिव्ह बँक लि.

### खेळतें भांडवल १९९ लक्ष रु. झालें

आवश्यक त्या तरतुदी करून, दि सारस्वत को. बँकेला ३०–६–१९५८ अखेर संपलेल्या वर्षी ९२,१७२ रु. निव्वळ नफा झाला. ३०–६–१९५७ अखेर संपलेल्या वर्षी तो ९३,८१५ रु. होता. बँकेच्या खेळत्या भांडवलांत २० लक्ष रु. ची वाढ होऊन, तें १७९ लक्ष रु. वरून १९९ लक्ष रु. वर गेलें. बँकेच्या वाढलेल्या ७,९७,८४० रु. भांडवलावर कमिटीनें ६¼% डिव्हिडंडची शिफारस केली आहे.

## रिझर्व्ह बँकेपाशीं असलेल्या ट्रेझरी बिलांचें कर्जरोख्यांत रूपांतर

रिझर्व्ह बँकेपाशी वाढत्या प्रमाणांत जमत असलेल्या ट्रेझरी बिलांचें योग्य मुदतीच्या कर्जांत हळुहळू रूपांतर करून घेण्याचा सरकारचा विचार असल्याचें अर्थमंत्र्यांनीं यंदाचा अर्थसंकल्प सादर करतांना सांगितलें होतें. भारत सरकारनें यंदापासूनच या दृष्टीनें सुरुवात करण्याचें ठरविलें आहे. तदनुसार सरकारनें ४ टक्के व्याजाचे १९७३ चे ३०० कोटी रुपयांचे आणखी कर्जरोखे निर्माण केले असून ते सर्वच्या सर्व रिझर्व्ह बँकेने आपल्या इश्यु डिपार्टमेंटकडे असलेल्या तेवढ्याच किंमतीच्या ट्रेझरी बिलांच्या बदल्यांत विकत घेतले आहेत. हे कर्जरोखे बाजारांत देवघेवीसाठीं ठेवण्यांत येणार नाहींत.

## नीरा सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास, जि. पुणें

### परीक्षेचा निकाल

दुसरा वर्ग पास—कृ. ग. आवारे, रा. पा. वेलसरे, वि. गो. दळवी, सो. तु. जगताप.

पास वर्ग पास—भि. बा. अपुणे, बा. तु. बंडगर, द. स. गोरे, ह. रा. गुरव, ज्ञा. ना. जाधव, स. अ. जाधव, स. सा. कदम, छ. बा. कलावंत, ना. मो. केंजळे, वि. श्री. सलटे, दा. गो. खोमणे, तु. ग. खोरे, सू. ग. मांढरे सं. के. नलावडे, भा. पां निंबाळकर, वि. कृ. पगार, बा. र. सय्यद, भा. भि. शितोळे.

**देना बँकचा नफा**—देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि. ला १९५८ च्या पहिल्या सहामाहींत ७.६० लक्ष रु. नफा झाला. १९५७ सालीं पहिल्या सहामाहींत तो ८.४४ लक्ष रु. होता. प्रत्येक भागावर करमाफ १.२५ रु. इंटेरिम डिव्हिडंड कायम आहे.

**तीन लक्ष बिडी कामगार बेकार**—विदर्भांतील सुमारें तीन लक्ष कामगारांवर बेकारीची पाळी आली आहे. राज्य सरकारनें बिडी कामगारांसाठीं किमानवेतन ठरविल्यामुळें बिडी कारखानदारांनीं आपले कारखाने १ जुलैपासून बंद केले आहेत.

## मोठ्या शहरांतील ट्रॅमची वाहतूक

पाश्चात्य देशांतील मोठ्या शहरांप्रमाणेंच भारतामधील मोठ्या शहरांतील वाहतुकीचा प्रश्न गुंतागुंतीचा असतो. युरोप-अमेरिकेंतील बहुतेक मोठ्या शहरांतून आतां लोकांची वाहतूक करण्यासाठीं ट्रॅम्सचा उपयोग करण्यांत येत नाहीं. भारतांतहि हळूहळू तसेंच होणें अपरिहार्य दिसतें. दिल्लीमधील ट्रॅम्सची वाहतूक ह्या वर्षअखेर बंद करण्यांत येणार आहे. ट्रम्वे कंपनीच्या नोकरांना बस कंपनींत सामावून घेण्यांत येणार आहे. आधुनिक मोठ्या शहरांतील धांवपळीचें जीवन लक्षांत घेतां ट्रॅम्स ह्या अपुऱ्या पडणाऱ्या आहेत. ट्रॅम्सच्या वाहतुकीनें आवाज फार होतो आणि आर्थिक दृष्ट्याहि ती तोट्याची पडते. दिल्ली ट्रॅम्वे कंपनीला दरमहा ३०,००० रुपये तोटा सहन करावा लागत आहे. मुंबईच्या कॉर्पोरेशनलाहि ट्रॅम्सच्या वाहतुकींत बराच तोटा सोसावा लागतो. तथापि मुंबई व कलकत्त्यासारख्या शहरांतून ट्रॅम्सची वाहतूक गरिबांच्या फायद्याची ठरली आहे. म्हणूनच मुंबई कॉर्पोरेशनमध्यें ट्रॅम्स बंद करण्याच्या सूचनेला नेहमीं विरोध होत असतो. मोठ्या शहरांतील लोकांची वाहतूक करण्यासाठीं ट्रॉली बसेस आणि भुयारी रेल्वेमार्ग विशेष सोयीचें ठरतात असा अनुभव पाश्चात्य देशांत आलेला आहे. मुंबई शहरांत भुयारी रेल्वेमार्ग बांधण्याची एक योजना जपानी तज्ज्ञांनीं तयार केलेली आहे. पण हा रेल्वेमार्ग लवकर बांधण्यांत येण्याची शक्यता कमी आहे. कारण, ह्या कामासाठीं येणारा प्राथमिक खर्च खूप जबर आहे.

---

## अन्नटंचाईच्या कारणांची मीमांसा

अविकसित देशांत गेल्या कांहीं वर्षांत अन्नधान्याच्या टंचाईनें उग्र स्वरूप धारण केलें आहे. ह्यासंबंधीं संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शेती व अन्नविषयक उपसंघटनेचे भारतीय डायरेक्टर जनरल श्री. विनय रंजन सेन ह्यांनीं आपले विचार प्रगट केले आहेत. श्री सेन म्हणतात कीं कांहीं अविकसित देशांत आज अन्नधान्याची टंचाई भासत आहे. ह्याचें कारण असें आहे कीं, ह्या देशांनीं औद्योगीकरण हें प्रगतीचें लक्षण मानून शेतीकडे दुर्लक्ष केलें. पण, हा दृष्टीकोण चुकीचा आहे. उद्योगधंद्यांत पुढारलेल्या देशांकडून कच्च्या मालाची व अन्नाची मागणी येत असते. पण ह्या देशांकडून येणारी मागणी ही अविकसित देशांकडून येणाऱ्या औद्योगिक मालाच्या मागणीपेक्षा कमी आहे. ह्याचा अर्थ असा कीं, अविकसित देशांची औद्योगिक मालाची मागणी औद्योगिक देशांकडून करण्यांत येणाऱ्या मालाच्या मागणीपेक्षा अधिक प्रमाणांत आहे. ह्या परिस्थितीवर एक उपाय करतां येण्यासारखा आहे. उद्योगप्रधान देश आपल्या संरक्षणव्यवस्थेवर बराच पैसा खर्च करीत आहेत. त्यांनीं ह्यापैकीं कांहीं पैसा अविकसित देशांत भांडवल म्हणून गुंतवला पाहिजे. शिवाय, अविकसित देशांतील कच्चा माल वाजवी किंमतीला विकण्याच्या कामीं अडचणीहि फार येतात. दुसरें असें कीं, अधिक उत्पादन झालें कीं उत्पादित मालाचा खप वाढतो अगर लोकांच्या उत्पन्नांत आपोआप वाढ होते असेंहि नाहीं. खरा प्रश्न वेगळाच आहे. ज्या लोकांच्या गरजा भागलेल्या नाहींत अशा लोकांजवळ वस्तु खरेदी करण्यासाठीं पुरेसा पैसा नाहीं, ही खरी अडचण आहे.

## सहकारी शेतीबद्दल सावधगिरीचा इशारा

बंगलोर येथील बसवनगुडी सहकारी संस्थेचा सुवर्णमहोत्सव नुकताच साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना सुप्रसिद्ध एंजिनिअर डॉ. एम्. विश्वेश्वर अय्या म्हणाले कीं, देशांतील राजकीय पक्ष सहकारी शेतीचा पुरस्कार करीत असतात. आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होत नाहींत अशा लहान शेतांचें एकत्रीकरण करण्याची सुधारणा इष्ट अशीच आहे. कारण, मोठ्या शेतांमधून आधुनिक पद्धतीनें मशागत करणें सोपें जातें. पण, म्हैसूरसारख्या आणि सामान्यपणें ज्या राज्यांत रयतवारीपद्धति आहे, अशा राज्यांतून सहकारी शेतीची अंमलबजावणी करण्यांत आल्यास ग्रामीण जीवनाची आर्थिक व सामाजिक घडी विसकटून जाण्याची भीति आहे. भारतांत स्वतःच्या मालकीची जमीन असणारा शेतकरीवर्ग हा समाजाच्या कण्यासारखा आहे. म्हणून त्याची जमीन काढून घेण्यांत आल्यास त्याचा खेड्याशीं असलेला एकच एक दुवा तोडला जाईल आणि त्याला खेड्यांत राहण्यास कांहींच आकर्षण राहणार नाहीं. तेव्हां शेतीच्या व्यवसायाला सहकारी तत्त्व लागूं करण्यापूर्वी सरकारनें गंभीरपणें विचार केला पाहिजे. तथापि, देशाच्या अर्थव्यवस्थेंत सहकारी संस्थांना एक निश्चित व महत्त्वाचें स्थान आहे ह्यांत शंका नाहीं. आर्थिक व्यवहारांतील अनिर्बंध स्पर्धेला कांहीं प्रमाणांत आळा घालण्याच्या कामीं सहकारी पद्धतीचा उपयोग होतो. विशेषतः गरीब व मध्यमवर्गाला अशा संस्थांचा विशेष फायदा होतो. ग्राहकांना लागणाऱ्या वस्तु स्वस्त किंमतीला देण्याचें महत्त्वाचें कार्य अशा संस्था करीत असतात.

---

## चार पौंडांवरील माकडांच्या निर्गतीस पुनः परवानगी

गेल्या फेब्रुवारींत भारत सरकारनें सहा पौंडपेक्षा कमी वजनाच्या माकडांची निर्गत बंद केली होती. ह्या नियंत्रणामुळें पुरेशीं माकडें प्रयोगांसाठीं मिळूं शकत नाहींत, अशा परदेशांकडून तक्रारी आल्यामुळें सरकारनें आतां चार पौंडांवरील माकडांच्या निर्यातीस परवानगी दिली आहे. त्यापेक्षा कमी वजनाच्या माकडांना परदेशीं पाठवितां येणार नाहीं. म्हणजे, फेब्रुवारीच्या पूर्वीप्रमाणेंच माकडांची निर्गत होईल.

---

**केरळ सरकारचें हुंडाविरोधी बिल**—केरळच्या राज्यसरकारनें हुंडा देण्या-घेण्यास मनाई करणारें बिल विधान सभेंत मांडलें होतें. आतां तें चिकित्सा समितीकडे सोपविण्यांत आलें आहे. बिलांत २,००० रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे आहेर देण्याची बंदी केलेली आहे.

**आसाममधील चित्रपट-निर्माते**—आसाममधील चित्रपटनिर्मात्यांवर कच्च्या फिल्मच्या आयातीबद्दल घालण्यांत आलेले निर्बंध भारत सरकारनें सैल केले आहेत. ह्या प्रकरणांत आसामचे मुख्यमंत्री श्री. विमल प्रसाद ह्यांनीं जातीनें लक्ष घातलें व रदबदली केली.

**मद्रासचा समुद्रकिनारा**—मद्रास शहराचा समुद्रकिनारा अधिक आकर्षक करण्यांत येणार आहे. मद्रास विद्यापीठाच्या समोर असणाऱ्या किनाऱ्यावर महात्मा गांधींचा पुतळा बसविण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें श्रमाचें सार्थक दाखविणारा एक पुतळाहि उभारण्यांत येणार आहे.

## शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या, ठेवी व कर्जें ह्यांची राज्यवार वांटणी
(१९५७)

| राज्यें / यूनियन शासित प्रदेश | राज्यांतील बँका | बँक कचेऱ्यांची संख्या | किती लोकसंख्येस एक कचेरी | ठेवी (लक्ष रु.) | एकूण ठेवींशी प्रमाण | दर माणशीं ठेव (रु.) | कर्जें (लक्ष रु.) | एकूण कर्जांशी प्रमाण | दर माणशीं कर्ज (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **राज्यें** | | | | | % | | | % | |
| आंध्र प्रदेश | १९ | २५७ | १,२५,२९२ | ३६,९५ | ३ | ११·५ | ३३,७८ | ४ | १०·५ |
| आसाम | ५ | २६ | ३,४६,१५४ | ८,०३ | १ | ८·९ | १,८७ | — | २·१ |
| बिहार | ११ | १३२ | २,९४,६९७ | ३४,११ | ३ | ८·८ | १४,४३ | २ | ३·७ |
| मुंबई | ५४ | ६९६ | ६८,६७८ | ४२९,०३ | ३१ | ८९·८ | ३२३,०० | ३८ | ६७·६ |
| केरळ | २३ | १८८ | ७२,३४० | ३६,८७ | ३ | २७·१ | २३,११ | ३ | १७·० |
| मध्य प्रदेश | १३ | १५२ | १,७१,७११ | २९,५२ | २ | ११·३ | १९,९४ | २ | ७·६ |
| मद्रास | ४० | ४२३ | ७०,९२२ | ८६,८९ | ६ | २९·० | ७०,११ | ८ | २३·४ |
| म्हैसूर | २४ | २५६ | ७४,२१९ | ४१,४६ | ३ | २१·८ | २५,२३ | ३ | १३·३ |
| ओरिसा | ५ | २४ | ६,०८,३३३ | ४,८२ | — | ३·३ | ८९ | — | ०·६ |
| पंजाब | २१ | २७१ | ५९,०४१ | ७३,२७ | ५ | ४५·८ | २२,३९ | ३ | १४·० |
| राजस्थान | ११ | १२४ | १,२९,०३२ | २५,६३ | २ | १६·० | १६,९८ | २ | १०·६ |
| उत्तर प्रदेश | २३ | ३८८ | १,६२,८८७ | ९१,५८ | ७ | १४·५ | ५५,७१ | ६ | ८८ |
| प. बंगाल | ३७ | १९७ | १,३२,९९५ | २४७,४३ | १८ | ९४·४ | २२३,१५ | २६ | ८५·२ |
| जम्मू व काश्मीर | ४ | १० | ४,४०,००० | ५,६८ | — | १२·९ | १५ | — | ०·३ |
| **यूनियन शासित** | | | | | | | | | |
| दिल्ली | ३६ | १०८ | १५,७१४ | २०९,९६ | १५ | १२३५·१ | २६,६८ | ३ | १५६·९ |
| हिमाचल प्रदेश | ४ | ९ | १,११,१११ | ६५ | — | ६·५ | ३ | — | ०·३ |
| पाँडिचरी | ३ | ५ | १६,६०० | १,७५ | — | २१०·८ | ८३ | — | १००·० |
| त्रिपुरा | ३ | ३ | २,००,००० | ५१ | — | ८·५ | ३ | — | ०·५ |
| अंदमान निकोबार बेटें | १ | १ | ३१,००० | २ | — | ६·५ | — | — | — |
| एकूण | | ३,२७० | १,१०,२१८ | १,३६४,१६ | | ३७·८ | ८५८,३१ | | २३·८ |


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००
रिझर्व्ह फंड व
इतर रिझर्व्ह रु. १,१४,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ७०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ८५,५००

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.